CLASSMA
Date :
Page :

# जगणं

जाईन आता मॉर्निंग वॉकला बागेत,
अन् टाकेन एक कटाक्ष ओळखीच्या
कोवळ्या उन्हात हसणाऱ्या फुलांकडे!
कधी पाहीन एखादे छानसे नाटक,
बालगंधर्वला जाऊन आणि नक्की बघेन
आर्टगॅलरीतली पेंटींग्ज् सुंदर आणि मोहक!
खाईन कधीतरी रामनाथची भजी
किंवा चमचमीत मिसळ बेडेकरांची
आणि त्यावर माझी आवडती सोलकढी!
बसेन जाऊन सवाईगंधर्वच्या मंडपात कधी
आणि घेईन कानात साठवून ती भारलेली
हरिप्रसादची बासरी किंवा परवीनची भैरवी!
भटकेन एम जी रस्त्यावरून उगाचच,
भाजलेले शेंगदाणे तोंडात टाकत, अन
न्याहाळत रंगीबेरंगी कपड्यांचे नाना विभ्रम!
लावेन हजेरी कधी वसंत व्याख्यानमालेला
तर कधी रंगलेल्या साहित्य संमेलनाला
रमेन छान तेथे प्रदर्शनात पुस्तकांच्या!
फिरेन कधी रात्रीच्या चांदण्यातून,
असाच इअरफोन कानाला लावून
ऐकत ऐकत कुमारजींची निर्गुण धून!
भिजेन अगदी रिमझीम पावसातही,
खुशीत घालेन हलकेच मस्त शीळ
बरेच दिवस जी ओठावर आलीच नव्हती!
घेतलं होतं स्वतःलाच किती कोंडून,
केवळ जीव वाचवण्याच्या ऊर्मीतून
खरं जगणंच गेलं होतं हरवून!!!

- शेखर कुलकर्णी